**<u>ठळक बातम्या</u>**

- शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- शेती आणि शेतकऱ्यांच्या समृद्धीवर विकसित भारताची निर्मिती अवलंबून असल्याचं केंद्रीय कृषीमंत्र्यांचं प्रतिपादन

- छत्तीसगडमधल्या बिजापूर इथं सुरक्षा दलांच्या कारवाईत ५ नक्षली ठार

**आणि**

- देशभरात आज ईद उल अजाहचा उत्साह/ राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांकडून देशवासियांना शुभेच्छा

**<><><><><>**

शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. एनडीए सरकारच्या ११ वर्षांच्या कार्यकाळात कष्टकरी शेतकऱ्यांची सेवा करण्याची संधी मिळाली, हे सरकारचं भाग्य असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. गेल्या ११ वर्षांत, विविध सरकारी उपक्रमांमुळे शेतकऱ्यांची समृद्धी वाढली असून, कृषी क्षेत्रात परिवर्तन घडून आलं. तसंच मातीचं आरोग्य आणि सिंचन यासारख्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित केल्यामुळे त्याचे चांगले परिणाम दिसत असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. आगामी काळातही शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी सरकारचे प्रयत्न सुरु राहतील असं आश्वासन त्यांनी दिलं.

**<><><><><>**

सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण ही तत्व अंगीकारून, केंद्रसरकारने गेल्या दशकभरात, विविध क्षेत्रांमध्ये केलेल्या प्रयत्नांमुळे, देशात उल्लेखनीय परिवर्तन

घडून आलं आहे. पर्यावरण संवर्धन आणि विकास हे यापैकी एक आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून.

**- होल्ड- व्हाइस कास्ट -**

***गेल्या दशकभरात, भारताने पर्यावरण संरक्षण आणि समावेशक विकासाचा मेळ घालणारं विकासाचं मॉडेल स्वीकारलं आहे. नद्यांचं संवर्धन करण्यापासून, ते परिसंस्थेचं जतन करण्यापर्यंत आणि हरित पायाभूत सुविधा निर्माण करेपर्यंत, देशानं संवेदनशीलतेनं संवर्धन करण्याची दृढ वचनबद्धता प्रदर्शित केली आहे.***

***नमामि गंगे मिशन, हा जगातल्या सर्वात मोठ्या नदी पुनरुज्जीवन कार्यक्रमांपैकी एक असून, यामुळे गंगा नदीच्या पाण्याची गुणवत्ता सुधारली, जैवविविधता वाढली आणि या कामात स्थानिक सहभागाला प्रोत्साहन मिळालं.***

***त्याचप्रमाणे, 'एक पेड माँ के नाम' योजनेने नागरिकांना पर्यावरणाबाबत कृती करण्यासाठी एकत्र आणलं. भारताने वन्यजीव संवर्धनातही लक्षणीय प्रगती केली आहे. तसंच देशात सध्या ९१ रामसर स्थळं असून, आशियामध्ये ही सर्वाधिक संख्या आहे. भारताचं हरित परिवर्तन हा केवळ धोरणात्मक उपक्रम नसून, ही एक लोकचळवळ आहे, आपल्या पृथ्वी ग्रहाप्रती असलेली जबाबदारी आहे आणि भविष्यातल्या पिढ्यांना दिलेलं वचन आहे.***

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपत्ती प्रतिरोधक पायाभूत सुविधांच्या निर्मितीचं महत्व अधोरेखित केलं असून, हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आवश्यक असलेल्या जागतिक प्राधान्यक्रमांची रूपरेषा स्पष्ट केली आहे. ते आज युरोपमध्ये आयोजित करण्यात आलेल्या आपत्ती प्रतिरोधक पायाभूत सुविधांबाबतच्या आंतरराष्ट्रीय परिषदेला दूरस्थ पद्धतीनं संबोधित करत होते.

आपल्या भाषणाचा समारोप करताना प्रधानमंत्री मोदी यांनी आंतरराष्ट्रीय समुदायाला आपत्ती प्रतिरोधक आणि प्रेरणादायी ठरतील अशा पायाभूत सुविधा निर्माण करण्याचं आवाहन केलं.

**<><><><><>**

भारतावरील कोणत्याही हल्ल्याला चोख प्रत्युत्तर दिलं जाईल तसंच दहशतवादी आणि त्यांना आश्रय देणाऱ्यांमध्ये कोणताही फरक केला जाणार नाही,

असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी एका वृत्तपत्रासाठी लिहिलेला लेख समाजमाध्यमावर शेअर करताना त्यांनी हे विधान केलं. सीमापार दहशतवादाबद्दल भारताच्या शून्य-सहिष्णुता धोरणाचा त्यांनी पुनरुच्चार केला.

**<><><><><>**

शेती आणि शेतकऱ्यांच्या समृद्धीवर विकसित भारताची निर्मिती अवलंबून आहे, असं प्रतिपादन केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केलं. विकसित कृषी संकल्प अभियाना अंतर्गत  मध्यप्रदेशातल्या  सेहोर इथं आयोजित कार्यक्रमात ते आज बोलत होते. शेतकऱ्यांनी शास्त्रज्ञ सल्ला ऐकून शेतीत सुधारणा करावी असं चौहान म्हणाले. या कार्यक्रमात ५१ कोटींच्या विकासकामांचं उद्घाटन करण्यात आलं. प्रधानमंत्री आवाज योजने अंतर्गत सूचिबद्ध असलेल्या कुटुंबांना घरं बांधायला चौहान यांनी यावेळी मान्यता दिली.

**<><><><><>**

देशातल्या ३३ कोटीहून अधिक एलपीजी ग्राहकांना सिलेंडरची मागणी नोंदवल्यानंतर १ तासाच्या आत ते पोहोचते केले जात असल्याची माहिती केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी दिली. जागतिक एलपीजी दिनानिमित्त ते बोलत होते. स्वयंपाकासाठी प्रत्येक कुटुंबाला स्वच्छ इंधन उपलब्ध करून देण्यासाठी सरकारनं केलेल्या प्रयत्नांमुळे हे शक्य झाल्याचं त्यांनी सांगितलं. प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेतून मिळणाऱ्या सिलेंडरमुळे धूरमुक्त स्वयंपाकाची सोय झाल्यानं १० कोटीहून अधिक महिलांची आरोग्य समस्यांमधून सुटका झाली. सोबतच  पैशांची आणि वेळेची बचत झाली आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

छत्तीसगडमधल्या बिजापूर इथं आज सुरक्षा दलांच्या कारवाईत ५ नक्षली मारले गेले. यामध्ये २ महिलांचा समावेश आहे. गेल्या ३ दिवसांपासून ही कारवाई

सुरू आहे. मृत नक्षलींची ओळख अद्याप पटली नसून त्यांच्याकडून स्वयंचलीत शस्त्रं जप्त करण्यात आली आहेत. मागच्या दोन दिवसांत संरक्षण दलांनी सुधाकर आणि भास्कर या दोन नक्षलींना ठार केलं. सुधाकर हा भाकप माओवादी या बंदी असलेल्या पक्षाचा केंद्रीय समिती सदस्य होता. त्याच्यावर एक कोटी रुपयांचं बक्षिस होतं. तर भास्कर हा स्पेशल झोनल कमिटीचा सदस्य असून त्याच्यावर ४५ लाख रुपयांचं बक्षिस होतं.

**<><><><>**

छत्तीसगड मधल्या नक्षलविरोधी कारवायांना मिळत असलेल्या यशाचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी कौतुक केलं. तसंच या जवानांची वैयक्तिकरित्या भेट घेण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली आहे. देशाला नक्षलवादी कारवायांचा असलेला हा अंतर्गत धोका केवळ धोरणात्मक रणनीती आखून आटोक्यात येत नाही तर जवानांचं शौर्य यात मोलाची भूमिका बजावतं असं ते म्हणाले. प्रादेशिक विकासात सहभागी होत असलेल्या शरणार्थींना केंद्र तसंच राज्य दोन्ही सरकारांकडून संपूर्ण संरक्षण मिळेल असं आश्वासन शाह यांनी दिलं. मुलांना शिक्षण, आरोग्यसुविधेची उपलब्धता आणि प्रत्येक नागरिकाला आवश्यक ओळख आणि कल्याणकारी तरतुदी मिळाल्या तरच खऱ्या अर्थाने विकास साधता येतो असं शाह यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

देशभर आज पारंपरिक उत्साहानं आणि श्रद्धेनं साजरा केल्या जात असलेल्या ईद-ऊल-अजहा अर्थात बकरी ईद निमित्त राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्री यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. ईदचा सण हा त्याग, श्रद्धा आणि मानवी मूल्यांचं प्रतीक असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

ईदचा सण सर्वांना त्याग, सामर्थ्य, आणि औदार्याच्या शक्तीची जाणीव करून देतो असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे.

या सणामुळे समाजात सुसंवादाची प्रेरणा आणि शांतीचे बंध अधिक दृढ होतात असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही नागरिकांना ईदच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

मुस्लिम समुदायाने आज ईदगाह आणि मशिदीत जाऊन ईद निमित्त नमाज अदा केली आणि परस्परांना शुभेच्छा दिल्या.

राजधानी दिल्लीत जामा मशिद, फतेहपुरी मशिद आणि शाही ईदगाह इथं ईदचा मुख्य सोहळा पार पडला.

महाराष्ट्रातही अनेक ठिकाणी ईद उत्साहात साजरी करण्यात आली.

**धुळे** शहरात मुस्लिम समुदायाने पांझरा नदीकिनारी ईदगाह मैदान इथं दरवर्षीप्रमाणे सामुहिक नमाज अदा केली.

**वाशीम, बीड, जालना आणि पुण्यातही** ईद उल अजहाची नमाज अदा करण्यात आली.

**<><><><><>**

पहलगाम इथल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, दहशतवादाविरोधातली भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी सर्वपक्षीय प्रतिनिधिमंडळं जगातल्या विविध देशांना भेट देत आहेत.

भाजपा खासदार रविशंकर प्रसाद यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं आज बर्लिनमध्ये जर्मन सरकारच्या उच्चपदस्थ प्रतिनिधींची भेट घेतली. यावेळी त्यांनी

भारताचं दहशतवादाविरोधातलं शून्य सहिष्णुता धोरण आणि सीमापार दहशतवादाचा सामना करण्याची रणनीती स्पष्ट केली.

दहशतवादाविरोधात आंतरराष्ट्रीय समुदायानं एकत्र येण्याची तातडीची गरज असल्याचं मत जर्मन सरकारच्या प्रतिनिधींनी व्यक्त केलं, तसंच भारताच्या भूमिकेला पाठिंबा दर्शवला.

<><><><><>

बेंगळुरूमध्ये झालेल्या चेंगराचेंगरी प्रकरणी कर्नाटक पोलिसांनी या सोहळ्याच्या आयोजनात त्रुटी ठेवल्याचा आरोप करत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू फ्रँचाइजी, कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशनचे काही सदस्य आणि इतर काही जणांविरोधात नव्यानं FIR दाखल केला आहे.

दरम्यान, या कार्यक्रमाच्या आयोजनात निष्काळजीपणा केल्याचा आरोप करत विरोधी पक्षांनी कर्नाटक राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

//<><><><><>//